महाराष्ट्र विधानपरिषद

दिवसाच्या कामकाजाचा क्रम

गुरुवार, दिनांक २१ डिसेंबर, २०१७

(सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत)

लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —

(बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना) — (अनुक्रमांक (१) व (२)) —

(१) **श्री. संजय दत्त, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात मोठ्या प्रमाणात माहितीच्या अधिकारांची प्रकरणे प्रलंबित असून गेल्या काही महिन्यापासून मुख्य माहिती आयुक्तपद रिक्त असल्यामुळे तब्बल अडीच हजार अपिले प्रलंबित असणे, नाशिक विभागीय माहिती आयुक्तांकडे सर्वाधिक १० हजार ६०० अपिले प्रलंबित असून पुणे विभागीय माहिती आयुक्तांकडे ८ हजार २४६, अमरावती विभागात ७ हजार ४००, औरंगाबाद ७ हजार तर कोकण विभागात ४ हजार अपिले असणे, मुख्य माहिती आयुक्त सर्व विभागीय माहिती आयुक्तांवर नियंत्रण ठेवत असतात मात्र गेल्या काही महिन्यांपासून हेच पद रिक्त ठेवण्यात आल्याने अनेक प्रकरणे प्रलंबित राहत असल्याने नागरिकांच्या हक्कावर गदा आणण्याचे काम होत असणे, वैयक्तिक माहितीच्या नावाखाली भ्रष्ट अधिकारी वर्गाची माहीती न देण्यासाठी शासनाने परिपत्रक काढत अशा पारदर्शक माहितीस वैयक्तिक माहिती कक्षेत आणत अपारदर्शक कामास चालना दिलेली असणे, माहितीचा अधिकार कायदयाच्या प्रचार व प्रसारासाठी राज्य शासनाने गेल्या ७ वर्षात ३३.४० लाख रुपयांची तरतूद केली पण प्रत्यक्ष केलेल्या खर्चाची माहिती शासनाकडे नसणे, तसेच खासदार-आमदारांना दिल्या जाणाऱ्या माहितीवर शासनाकडून अंकूश आणण्यात येणार असून त्यांना कोणती माहिती द्यायची याचे धोरण ठरविण्यासाठी गृह विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आलेली असणे, ती कोणत्याही फाईल वरील मंत्री किंवा सचिवांचे अभिप्राय आदी विरोधकांना व सामान्य लोकांना न देण्याचा सरकारचा यामागील डाव असणे, पारदर्शक कारभारासाठी तयार करण्यात आलेल्या माहितीचा अधिकार कायदयाची अशा प्रकारे पायमल्ली होत असतानाही याकडे राज्य शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत राज्य शासनाने तातडीने लक्ष घालून माहीती आयुक्तांची नियुक्ती त्वरीत करण्याची आवश्यकता व माहिती अधिकारातील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा होण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. जयंत पाटील,** सुनिल तटकरे, धनंजय मुंडे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"काटोल जि.नागपूर येथील नगर परिषदेमध्ये एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधार कार्यक्रम अंतर्गत हेटी बुधवार पेठ येथे एकुण १३० घरकुलांचे बांधकाम करून या कार्यक्रमांतर्गत ९० घरकुले लाभार्थी यादीनुसार लाभार्थ्यांना वाटप करण्यात येणे, उर्वरित ४० घरकुले राजकीय हितसंबंध जपणाऱ्यांना वाटप करण्यात येणे, सबब या कार्यक्रमांतर्गत ४० घरकुलांचे वाटप करण्याकरिता एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधार कार्यक्रम योजनेतील नियमाप्रमाणे लाभार्थ्यांची कोणतीही यादी सक्षम समितीकडून मंजुर न करणे, तसेच पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणुन नियुक्ती करणे, काटोल नगर परिषदेमध्ये कनिष्ठ अभियंता असतानाही श्री.तडस यांची प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणुन नियुक्ती करण्यात येणे, नगर पालिकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांनी श्री.तडस यांना केवळ ४-५ नमुना घरांचे नकाशे व प्राकलन बनवण्याचे शुल्क न देता ६०१ घरासाठी शुल्काची आकारणी करून श्री.तडस यांनी स्वत:चा १३ लक्ष अवाजवी अति फायदा करणे, तसेच स्थायी निर्देश क्रमांक ४० दिनांक २०/९/२०१६ प्रमाणे प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार यांना ठोक पध्दतीने देय देणे बंधनकारक असणे, असे असतानाही शतमान पध्दतीने देण्यात आल्याने नगर परिषदेच्या फंडीचे आर्थिक नुकसान होणे, तसेच प्रकल्प व्यवस्थापक सल्लागाराचे पैसे नगर परिषद काटोलने गटनेते व सदस्य यांच्या आदेशावरून अध्यक्ष, उपाध्यक्ष व मुख्याधिकारी यांनी संगनमत करून सभागृहाची मंजुरी न घेता श्री.तडस यांना १३ लाख रुपये नगर परिषद फंडातुन अदा करण्यात येणे, भुडकानाला विकास आराखड्यातील आरक्षण क्रमांक २४ हे खेळाच्या मैदानाकरिता आरक्षित असतानाही सर्व नियम धाब्यावर बसवून त्याठिकाणी निकृष्ट दर्जाचे घरकुलाचे बांधकाम केलेले असणे, त्याचबरोबर पंचवटी काटोल येथे नगर परिषदेच्या मालकीचे बाजार ओटे सन २००९-२०१० या कालावधीत बांधण्यासाठी विशेष सभा ठराव क्रमांक ५ दिनांक २७/७/२००९ च्या ठरावामध्ये पंचवटी येथे म्हाडा कॉलनीचे खसरा क्रमांक १८५/५ खुल्या जागेमध्ये ओटे बांधकामास मंजुरी देऊन सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत ४ लाख ९२ हजार १३२ एवढी रक्कम खर्च करुन ओटे बांधकाम करण्यात येणे, परंतु, दिनांक ९/७/२०१७ ला रविवार असताना कनिष्ठ अभियंता यांनी नगर परिषदेच्या ठरावात नसतानाही ओटे तोडण्याची कारवाई करण्यात येणे, यामुळे स्थानिकांत पसरलेला तीव्र असंतोष व शासनाने या विषयी करावयाची उपाययोजना व शासनाची भूमिका."

(३) **श्री. अनिल भोसले, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे शहरातील नागरिकांना पुरेसे पाणी मिळावे यासाठी महापालिकेच्या

वतीने राबविण्यात येत असलेली समान पाणीपुरवठा योजना मार्गी लावण्याकरिता ती तातडीने मंजुर करावी, यासाठी पुणे महापालिका आयुक्त आग्रही असणे, या योजनेबाबत सर्वच पक्षांचे सभासद सकारात्मक असताना त्यातील त्रुटी व शंकाचे निवारण प्रशासनाकडून करण्याऐवजी योजनेची निविदा काढण्याची गडबड सुरु असणे, पुणे मनपा कडे १२०० कोटी रुपयांच्या कायम ठेव (FIXED DEPOSIT) असताना त्या ठेवीवर कर्ज घेतले तर २०० कोटी रुपये मिळाले असते, परंतु, या योजनेसाठी प्रशासनाने २०० कोटी रुपयांचे कर्ज घेतले असून त्याचे व्याज म्हणून दरमहा १५ लाख रुपये दिले जात असणे, आजपर्यंत किती रक्कम व्याजापोटी पालिकेने दिलेली असणे याचा हिशोब नसणे, या योजनेतंर्गत बसविले जाणारे मिटर कालबाह्य असणे, शेकडो कोटी रुपयांच्या चार निविदांसाठी केवळ तीनच कंपन्यांचा सहभाग असणे, जादा दराने निविदा आल्याने आर्थिक तरतुद कमी पडणे, निविदेमध्ये कोणतीही स्पर्धा नसणे, सदर निविदेच्या अटी विशिष्ट कंपनीचे हित लक्षात घेऊन त्यांच्या पात्रतेनुसार अटी व शर्ती टाकण्यात आलेल्या असणे, सदर निविदा धोरणानुसार पुणे मनपा मुख्यसभेत मान्य करुन घेण्यात आलेली नसणे, गेल्या दहा वर्षात महापालिका प्रशासनाने जवळपास ३०० कि.मी. च्या जलवाहिन्या टाकलेल्या असणे, त्यावर ४०० कोटी रुपये खर्च झाला असल्याचे समोर येणे, दोन इंचापासून ४९ इंच व्यासाच्या जलवाहिन्या टाकण्यात येणे, याकरिता सर्वाधित ११० कोटीचा खर्च करण्यात येणे, विशेष म्हणजे याच वर्षी ही योजना सुरु करणे, असे असतानाही एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रशासनाने खर्च करणे, परिणामी पुणेकरांमध्ये सदर योजनेबाबत शंका निर्माण झाली असून ही योजना ठेकेदारांचे व पुणे मनपा प्रशासनाचे हित जोपासणारी असल्याचा संभ्रम निर्माण झालेला असणे, तसेच पुणे मनपा सभासदांना योजनेची संपूर्ण माहिती प्रशासन देत नसल्याने सभासदांमध्ये निर्माण झालेले संतपाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री. गोपीकिसन बाजोरीया, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"स्टँप ॲक्टनुसार प्रत्यक्ष नोंदणी झालेल्या व्यवहारानुसार रेडी रेकनरचे दर ठरविणे गरजेचे असतांनाही तसे न करता व कोणत्याही प्रकारचे वैधानिक सर्वेक्षण न करता ठरविण्यात आलेले रेडी रेकनरची दरवाढ चुकीची असणे,अकोल्यातील बाजार मुल्य (रेडी रेकनर) चे २०१० पासून २०१६ पर्यंत अंदाजे तीन ते पाच पट वाढ करण्यात येणे, बाजारात प्रत्यक्ष दर घसरलेले असतांनाही शासनाच्या बाजार मुल्यानुसार स्टँम्प डयुटी भरावी लागणे,सदर रेडी रेकनरच्या वाढीव किंमतीमुळे केवळ स्टॅम्प डयुटीच जास्त भरावी लागत नसून त्याचा परिणाम आयकर,व्हॅट,सर्विस टॅक्स व विकास शुल्कावर होत असणे, सन २०११ नंतर ५ वर्षात बांधकामाचे दर रु. ७५००/- प्र.चौ.मी वरुन रु.

१८०००/- प्र.चौ.मी होणे,गौण खनिज दर व मजुरी वगळता जागतिक मंदीमुळे बांधकाम साहित्याचे दर कमीच झालेले आढळत असले तरी बांधकाम दरात ५ वर्षात २२५ टक्के दरवाढ व या उलट सन २००७ ते सन २०११ या ५ वर्षात ४० टक्के दरवाढ करणे,शासनाकडून रु. १८०००/- प्र.चौ.मी हा दर गृहीत धरुन त्यावर स्टँप डयुटी आकारली जाणे, त्यामुळे इन्कमटॅक्स, सर्व्हीस टॅक्स, विकास शुल्क, व्हॅट, कॅपिटल गेन इत्यादिंवर खूप मोठा फरक पडत असल्याने त्याचा दुप्पट भुर्दंड ग्राहकांना सोसावा लागणे,याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिकिया व भूमिका."

(५) **श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"वाघाच्या हल्यात यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा, राळेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना वाघाने ठार केल्याच्या घटना माहे जुलै २०१७ ते ऑक्टोबर २०१७ पर्यंत नेहमीच घडत असणे, यात आतापर्यंत १० ते १२ लोकांना वाघाने ठार केलेले असणे व अनेक जनावरांना वाघाने फस्त केलेले असणे, सखी येथे वाघाच्या हल्यात ठार झालेला सतीश कोवे मृत्यू प्रकरणी जनमानसात उसळलेला रोष आणि परिमाणी येथे उपविभागिय अधिकाऱ्यांची जाळलेली गाडी यामुळे येथे तात्पुरती टीम पाठवून वाघाला पकडण्याचे अयशस्वी प्रयत्न करण्यात आलेले असणे, या भागात वारंवार शेतकरी शेतमजुरांचा वाघाच्या हल्यात मृत्यू होत असतांनाहि येथील स्थानिक वनविभाग तात्पुरत्या उपाययोजना करीत असणे, या वाघाला पकडून जंगलात सोडून देण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री. रामहरी रुपनवर वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अन्वये सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी मुलभूत सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक असणे, तसेच याच अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने विहित मुदतीत कायद्यानुसार सुविधा उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले असणे, त्याअन्वये ठराविक कालमर्यादेत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने न्यायालयात शपथपत्र सादर केलेले असणे, तथापि त्यानंतर अनेक वर्ष उलटूनही यवतमाळ जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये सर्व सुविधा पुरविण्यात आल्या नसणे, क्रीडांगणाची जागा उपलब्ध नसणे, जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात मुलामुलींकरीता स्वतंत्र शौचालय, रॅम्प, वर्गखोल्या नसणे, इतर अनुषंगिक सुविधा उपलब्ध नसणे, केंद्र सरकारने सन २००२ च्या ८६ व्या संविधान अधिनियमान्वये अनुच्छेद २१ (अ) मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या मुलभूत

अधिकाराचा समावेश केलेला असणे, स्थानिक संस्थांवर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे अजिबात नियंत्रण नसणे, अपेक्षित शौचालय/युनिट व इतर सुविधेअभावी मागासवर्गीय, आदिवासी, विमुक्त भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय मुलामुलींची कुचंबणा होणे, सदर अधिनियमाचे पालन न होणे, तसेच या सर्व प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचेही पालन न होणे, तसेच शासनातर्फे न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करण्यात येणे, अशाच प्रकारची अनियमितता संपूर्ण राज्यात असण्याची शक्यता असणे, तसेच अस्तित्वात असलेले बहुतांश शौचालय/ मुताऱ्या ह्या नादुरुस्त असणे, जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांना सुविधा मिळण्याची अत्यंत गरज असणे, या कामी हलगर्जीपणा करणाऱ्या संनियंत्रण व संबंधीत अधिकाऱ्यांवर शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **श्री. नागोराव गाणार,** प्रा. अनिल सोले, श्री. गिरीशचंद्र व्यास, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शिक्षणाधिकारी (प्राथ.), जि.प. नागपूर कार्यालयात अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी असतांना, पदे भरतीस दिनांक २ मे, २०१२ पासून बंदी असतांना, पायाभूत पदांचा विचार न करता, शासन परवानगी शिवाय अनुशेष असतांना पद भरण्याची विहीत कार्यपध्दती न अवलंबता केलेल्या नियुक्तीस मान्यता प्रदान करण्यात येणे, विना अनुदानीत सेवा केली नसताना सहाय्यक शिक्षक म्हणून मान्यता प्रदान करणे, समायोजनास पात्र नसलेल्या कर्मचाऱ्यांचे समायोजन करणे, इत्यादी अनियमित बाबींवर असंख्य तक्रारी शिक्षण संचालक यांना लोकप्रतिनिधी व संघटनाद्वारे करण्यात येणे, नागपूर जिल्हयातील भ्रष्टाचार सुस्पष्ट दिसत असतानाही शिक्षण संचालक यांनी हा भ्रष्टाचार दुर्लक्षीत करुन दिनांक १ मार्च, २०१४ च्या परिपत्रकान्वये सर्व शिक्षणाधिकारी यांना सूचना देऊन नागपूर जिल्हयातील भ्रष्टाचारात समाविष्ट असणाऱ्या अधिकाऱ्यांना अभय देणे, शिक्षण संचालक (प्राथ.) यांच्या आदेशात हेराफेरी करुन विशिष्ट व मर्जीतील शाळांना दिनांक १ सप्टेंबर, २०१६ पासून २० टक्के अनुदान देय असतानासुध्दा अनधिकृतपणे १०० टक्के अनुदान वितरीत करणे, शिक्षण आयुक्त यांनी स्वत: दिनांक २१ जून, २०१७ ते दिनांक २३ जुलै, २०१७ पर्यंत उपस्थित राहुन अधिक्षक, वेतनपथक, नागपूर यांच्या कार्यालयाची कसून चौकशी करणे, शिक्षण संचालक (प्राथ.) यांच्या अनुदान वितरणाच्या आदेशात बदल केल्याचे सुस्पष्ट दिसुन आल्यानंतरही आयुक्त, शिक्षण विभाग यांनी प्रथम खबरी अहवाल न नोंदविणे, तक्रारीतुन वस्तुस्थीती निदर्शनास आणून दिल्यानंतरही भ्रष्टाचारी अधिकारी/कर्मचारी यांना अभय देण्याची कृती शिक्षण आयुक्त कार्यालयातील एक उच्चपदस्थ अधिकारी उपरोक्त भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांना वाचविण्याकरीता पुरेपुर प्रयत्न करीत असणे, याबाबत संबंधित

लोकप्रतिनिधींनी शासनाकडे शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालक (प्राथ.) यांच्याकडे वारंवार तक्रारी करुन सुध्दा संबंधितांनी त्यांची चौकशी करुन फौजदारी गुन्हा दाखल न करणे, त्यामुळे शासनाचे करोडो रुपयांचे झालेले आर्थिक नुकसान, त्यामुळे शिक्षण संस्था, शिक्षक कर्मचाऱ्यांची फसवणूक यामुळे शासन विरोधात पसरलेला तीव्र असंतोष, नैराश्य व त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(८) **डॉ. सुधीर तांबे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शासनाने डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर द्वारा ऑनलाईन प्रक्रिया सुरु केल्यामुळे अनेक शिक्षण संस्था अडचणीत आलेल्या असणे, त्यामुळे महाविद्यालयेही आर्थिक अडचणीत सापडणे, ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेले आहेत त्यातील साधारणत: ५० टक्के रक्कम ही शासनाकडून प्राप्त होणार असणे, अशा परिस्थितीत महाविद्यालयांना नवीन विद्युत उपकरणे घेणे, शिक्षकांचा पगार वेळेत करणे, इ. अडचणींना सामोरे जावे लागणे, मागासवर्गीय विद्यार्थ्यांची प्रतिपूर्ती बाबत ५० टक्के हप्ता हा दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ पूर्वी देण्याचे शासन निर्णय असतानाही अद्याप विद्यार्थ्यांचे फॉर्म स्वीकारण्याची प्रक्रिया पूर्ण न होणे, तसेच विद्यार्थ्यांच्या खात्यावर थेट शिष्यवृत्ती जमा करण्याच्या निर्णयामुळे विद्यार्थ्यांनी जर महाविद्यालयात पैसे दिले नाहीत तर ते वसूल करण्यांची पध्दत काय असेल विद्यार्थ्यांनी पैसे दिले नाहीत तर त्यांची हमी शासन घेणार काय, असा प्रश्न उपस्थित झाला असतानाही शासन त्याकडे करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी शिक्षण संस्थांत निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व चिडीची भावना, त्यामुळे शासनाने यावर तोडगा काढण्याकरीता करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(९) **सर्वश्री. धनंजय मुंडे,** जयवंतराव जाधव, सुनिल तटकरे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री. किरण पावसकर, ॲड. राहुल नार्वेकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईच्या समतानगर, कांदिवली (प.) येथील संयुक्त पुनर्विकास करण्यास शासनाकडून माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या सुमारास मान्यता देण्यात येणे, यामध्ये शासनाची हजारो कोटींची फसवणूक विकासक मे. एस.डी.कार्पोरेशन, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच मंत्री, गृहनिर्माण यांनी केलेली असणे, सर्व्हे क्र. ५५ व ५६ येथील २ लाख १३ हजार ८६७ चौ.मी. क्षेत्रफळाच्या जमिनीवर म्हाडाच्या एकूण १६५ इमारती विविध गटांकरीता बांधलेल्या असणे, सदर इमारतीमधील लाभार्थींच्या एकूण ८० सहकारी संस्था स्थापन केलेल्या असणे, या वसाहतीत लघु उत्पन्न गटाच्या एकूण ११३ इमारतीमधील १७८४ गाळ्यांची ४७ गृहनिर्माण संस्था एकत्र करुन

समता नगर को.ऑ.हौ.सो. युनियन लि. या फेडरेशनची निर्मिती करण्यात येणे, वरील क्षेत्रफळापैकी फक्त ९१ हजार चौ.मी. इतक्याच क्षेत्रफळाच्या पुनर्विकासास मंजूरी दिलेली असणे, या फेडरेशनमध्ये समाविष्ट असलेल्या ५ संस्थांनी स्वतंत्र पुनर्विकासासाठी परवानगी देण्याची विनंती म्हाडास करणे, मुख्याधिकारी, मुंबई मंडळ यांनी ज्या संस्था स्वतंत्र पुनर्विकास करु इच्छितात त्यांना तसा मुलभूत अधिकार आहे अशी स्पष्ट भूमिका घेतलेली असणे, शासनाने दिनांक ६.११.२००७ च्या पत्रान्वये एकत्रित पुनर्विकास करण्यासाठी युनियनला देण्यात आलेली परवानगी सदर युनियनशी संबंधीत असलेल्या ४७ सहकारी संस्थातील अल्प उत्पन्न गटाच्या १७८४ सभासदांच्या पुनर्विकासाशी (एकूण क्षेत्रफळ ९१ हजार चौ.मी.) बाबत असणे, मात्र त्याचा आधार घेऊन सदर युनियनने संपूर्ण २२.५ हेक्टर क्षेत्रावरील इमारतींच्या पुनर्वसनासाठी महानगरपालिकेकडून अभिन्यास मंजूर करुन घेणे, विकासक एस.डी. कार्पोरेशनने या एकत्रित पुनर्विकासाकरीता मंजूरी मिळणेबाबत गृहनिर्माण विभागास विनंती करणे, त्यावर मंत्री महोदयांकडे बैठकीचे आयोजन करणे, अप्पर मुख्य सचिव, गृहनिर्माण हे रजेवर गेल्याची संधी साधून त्या कालावधीचा अप्पर मुख्य सचिवांचा कार्यभार तत्कालीन उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे देण्यात येणे, त्यांनी स्वत:च शासनास सादर केलेल्या प्रस्तावावर अवघ्या चार दिवसांत मान्यता देण्यात येणे, हा प्रस्ताव ठरवून, संगनमताने विकासक, मंत्री, गृहनिर्माण व तत्कालीन उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी मंजूर करुन शासनाची फसवणूक केलेली असणे, या प्रकरणाची आर्थिक गुन्हे शाखा तसेच लाचलूचपत प्रतिबंधक विभागाकडून सखोल चौकशी होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची भूमिका व करावयाची उपाययोजना."

(१०) **सर्वश्री. सुनिल तटकरे,** जयंत पाटील, नरेंद्र पाटील, धनंजय मुंडे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) मौजे केळवली, वांगणी, घोडवली, कांढरोली, नावंढे, माणकिवली, अंजरूण, हाळखुर्द तसेच कर्जत तालुक्यातील मौजे तळवली, (ता.कर्जत, जि.रायगड) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ भूसंपादनात प्रस्तावित भाग-२ या भूसंपादनाला शेतकऱ्यांचा ठाम विरोध असणे, सदर शेतकऱ्यांचे शेत जमीन मिळकती संपादीत केल्यास कधीही न भरून येणारे नुकसान होण्याची निर्माण झालेली परिस्थिती, याबाबत सदर भूसंपादन रद्द करण्याबाबत शेतकऱ्यांनी महाराष्ट्र शासनाकडे महसूल विभाग, तहसिल कार्यालय, खालापूर, कर्जत, जिल्हाधिकारी, रायगड एम.आय.डी.सी. कार्यालय, प्रांत कार्यालय अशा सर्व शासकीय कार्यालयांना अनेकवेळा अर्ज व विनंत्या करूनही कोणत्याही

शासकीय यंत्रणेने लेखी स्वरूपात आश्वासन वा लेखी उत्तर अद्यापी न देणे, याबाबत संतप्त होऊन तीव्र आंदोलन करण्याचा घेतलेला निर्णय त्यामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, याबाबत शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रिया."

(११) **सर्वश्री. नरेंद्र पाटील,** हेमंत टकले, सुनिल तटकरे, धनंजय मुंडे, अमरसिंह पंडित, किरण पावसकर, जयवंतराव जाधव, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री. आनंद ठाकूर, ॲड. राहुल नार्वेकर, श्री. अनिल भोसले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कोल्हापूर जिल्ह्यातील मृदसंधारण विभागातील कोल्हापूर विभाग व सातारा विभागातील १०० कोटींच्या कामांमध्ये घोटाळा झाल्याची घटना माहे नोव्हेंबर, २०१० च्या तिसऱ्या सप्ताहात घडलेली असणे, सदर घोटाळया प्रकरणी विभागीय कृषी सहसंचालकांनी साताऱ्याचे जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकाऱ्यांसह एकूण ९४ अधिकारी व कर्मचाऱ्यांना नोटीस बजावून चौकशी सुरु केलेली असणे, कृषी विकासाच्या नावाखाली मृदसंधारणाची खोटी कामे दाखवून सन २०१४ ते २०१७ या कालावधीत या अधिकाऱ्यांनी सातारा जिल्हयात ५८८१ कामांवर १४९ कोटी रुपये खर्च केल्याचे दाखविलेले असणे, मात्र १०० कोटींची कामे संशयास्पद असून यामध्ये ६० टक्के रक्कमेचा भ्रष्टाचार झालेला असणे, तसेच सदर भ्रष्टाचाराची चौकशी तुर्तास बंद करण्याचे आदेश मंत्रालयातील कृषी विभागाने दिलेले असणे, या प्रकरणी चौकशी सुरु ठेवण्याची लोकप्रतिनिधींकडून होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१२) **ॲड. राहुल नार्वेकर,** सर्वश्री. सुनिल तटकरे, धनंजय मुंडे, नरेंद्र पाटील, बाळाराम पाटील, जयंत पाटील, किरण पावसकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेकडून वाकण-पाली-खोपोली राज्य मार्ग क्र.५४८ (ए) या ४१ (एम.एस.आर.डी.सी.) रस्त्याचे दुहेरीकरण करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला असणे, यामध्ये सन १९७४ साली झालेल्या भूसंपादीत जागे व्यतिरिक्त नव्याने मोबदला दिला जाणार असल्याचे सांगण्यात येणे, मात्र सन १९७४ साली भूसंपादन झाले असल्यास त्याचा मोबदला देण्यात न येणे, सद्यस्थितीत या जागी स्थानिकांची भात शेती, कडधान्य शेती या बरोबरच हॉटेल व किराणा व्यवसायाची दुकाने असणे, प्रस्तावित राज्य मार्गामुळे या सर्वांचे उदरनिर्वाहचे साधन नाहीसे होणे, एम.एस.आर.डी.सी. व महसूल प्रशासनाने कोणत्याही प्रकारची नोटीस न देता रस्ता रुंदीकरणाच्या साईड पट्यांचे काम सुरू केलेले असणे, ठेकेदाराने शेतीचे

कुंपण व इतर मोठी झाडे जे.सी.बी.च्या साह्याने तोडून सपाटीचे काम सुरू केलेले असणे, शेतकऱ्यांच्या ७/१२ च्या नोंदीवर व इतर हक्कात कुठेही भूसंपादनाची नोंद नसणे, इतर क्षेत्र वजा केलेले नसणे, त्यामुळे सुधागड शेतकरी समन्वय संघर्ष समितीने दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी तहसिल कार्यालय सुधागड-पाली, जि.रायगड येथे बाधित शेतकरी आमरण उपोषणास बसणार असल्याचे जाहीर करणे, मागील २ महिन्यांपासून त्यांनी मा.मंत्री सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) व जिल्हा प्रशासन यांचेकडे वारंवार लेखी निवेदने देऊनही त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, या भूसंपादनामुळे शेतकऱ्यामध्ये पसरलेला तीव्र असंतोष व शासनाने या विषयी करावयाची उपाययोजना व शासनाची भूमिका."

(दुपारी १२.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे.

दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे —

(क) मुख्यमंत्री : **(१)** "मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती, कळंबोली, पनवेल यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा एकोणतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(ख) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री : **(१)** "कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) "कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचे सन २०१६-२०१७ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

(३) "महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(ग) महिला व बाल : "महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचा सन २०१३-

	विकास मंत्री		२०१४ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.
(घ)	**आदिवासी विकास मंत्री**	:	"शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचा सन २०११-२०१२ व २०१२-२०१३ या वर्षांचा अनुक्रमे तेरावा व चौदावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.
(ङ)	**परिवहन मंत्री**	:	"महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा हिशेब व हिशेब तपासणी अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.
(च)	**उद्योग, खनिकर्म मंत्री**	:	**(१)** "महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांचे सन २०१२-२०१३ ते सन २०१५-२०१६ या वर्षांचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील. **(२)** "महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा एकेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. **(३)** "महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.
(छ)	**ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री**	:	"महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.
(ज)	**पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री**	:	**(१)** "पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा छत्तीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. **(२)** "महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, मुंबई (महानंद दुग्धशाळा) यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल" सभागृहासमोर

ठेवतील.

तीन : "लोकलेखा समितीचा तिसावा अहवाल सादर करणे."

चार : "सार्वजनिक उपक्रम / महामंडळानी त्यांच्याकडील रक्कम बँकेत डिपॉझिट करावयाची किंवा शासनाच्या कोषागारामध्ये जमा करावयाची याबाबत परिनिरीक्षण करुन सभागृहात अहवाल सादर करण्यासाठी घटित करण्यात आलेल्या विधानपरिषद सभागृहाच्या तदर्थ समितीचा अंतरिम अहवाल सादर करणे."

पाच : "अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे."

सहा : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —

(बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन) (अनुक्रमांक (१)) —

(१) **श्री.संजय दत्त, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ११** वर **मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

"दिनांक १० डिसेंबर, २०१७ रोजी मुंबईतील वरळी पोलीस मुख्यालयातील सशस्त्र दलात पोलिसांकडून संरक्षणार्थ वापरली जाणारी जिवंत काडतुसे चोरीला जाण्याची घडलेली घटना."

(२) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १६** वर **मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

"चेंबुर (मुंबई) येथे अंगावर झाड कोसळल्याने एका प्रवासी महिलेचा झालेला मृत्यू."

(३) **श्री.अनिल भोसले, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक २१** वर **मुख्यमंत्री** निवेदन करतील:-

"पुणे शहरातील वैद्यकिय व्यावसायिकांवर पालिकेने दंडात्मक कारवाई केलेली असूनही आरोग्याला अतिधोकादायक असलेल्या जैव वैद्यकिय कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यास पालिका प्रशासनास आलेले अपयश."

(४) **श्री.शरद रणपिसे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक २४** वर **मुख्यमंत्री** निवेदन करतील:-

"ता.पारनेर, (जि.अहमदनगर) कोहाकली येथे कुकडी नदीच्या पात्रात वाळू तस्करांवर कारवाई केल्यानंतर तहसिलदार भारती सागरे व त्यांच्या कर्मचाऱ्यांवर डिझेल टाकून त्यांना जिवंत जाळण्याचा केलेला धक्कादायक प्रकार."

(५) **श्री.नरेंद्र पाटील, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १०** वर **मदत व पुनर्वसन मंत्री** निवेदन करतील :-

"वांगमराठवाडी, ता.पाटण, (जि.सातारा) येथील सन १९९९ पासून वंचित असलेल्या प्रकल्पग्रस्तांचे नियोजन आराखड्यानूसार ताईगडेवाडी, ता.पाटण येथे पुनर्वसन करण्याची होत असलेली मागणी."

(६) **ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक २०** वर **आदिवासी विकास मंत्री** निवेदन करतील :-

"राज्यातील दलित, आदिवासींसाठी असणारा आदिवासी उपाययोजना व अनुसूचित जाती उपाययोजना अंतर्गत असलेला निधी इतरत्र वापरला जात असल्याने समाजामध्ये शासनाप्रती पसरलेली चिडीची भावना."

(७) **श्री.संजय दत्त, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक २३** वर **वैद्यकीय शिक्षण मंत्री** निवेदन करतील:-

"नागपूर येथील शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयांमध्ये सेवेत असतानाही येथील अनेक डॉक्टर नियमबाह्यपणे खाजगी रूग्णालयांमध्ये सेवा देत असल्याबाबत."

(८) **श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ८** वर **कृषी मंत्री** निवेदन करतील:-

"मौजे उमापूर, ता.गेवराई, जि.बीड येथील शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत २०१६-२०१७ करीता स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा उमापूर या बँकेत पिक विमा हप्ता विहित भरलेला असूनही बीड जिल्हा मध्यवर्ती सह.बँकेने पिक विमा नुकसान भरपाईच्या रकमेवर मोठ्या प्रमाणात नफेखोरी करून शेतकऱ्यांना रकमेपासून वंचित ठेवणे."

(९) **श्री.विक्रम काळे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक २२** वर **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** निवेदन करतील :-

"लातूर जिल्ह्यातील वसंतराव नाईक विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळाच्या कार्यालयात शासनाचा आलेली निधी बेकायदेशीरपणे लाभार्थ्यांना वाटप करण्यात असल्याबाबत."

सात : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).

आठ : <u>मा.समिती प्रमख, विधानपरिषद विशेषाधिकार समिती यांचा प्रस्ताव -</u>

"सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी श्री.रत्नाकर गुट्टे, संचालक, गंगाखेड शुगर ॲण्ड एनर्जी प्रा.लि. परभणी जिल्हा, परभणी यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

उपरोक्त प्रकरणावरील विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करण्याकरिता म.वि.प. नियम १७८(१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी."

नऊ : मुख्यमंत्री यांचा म.वि.प. नियम १०६ अन्वये शासकीय ठराव :-

ज्याअर्थी, भारत सरकारच्या, नागरी विमानचालन मंत्रालयाने, आंतरराष्ट्रीय वाहतुकीकरिता 'सार्वजनिक वापर' या श्रेणी अंतर्गत हवाई वाहतूक सेवेसाठी महाराष्ट्रातील शिर्डी जवळ, मौजे काकडी, तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर येथे विमानतळ उभारण्यास 'तत्वत:' मान्यता दिलेली आहे;

आणि ज्याअर्थी, नागरी विमान चालन महासंचालनालय, नागरी विमानचालन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी वायुयान अधिनियम, १९३४ (१९३४ चा २२) याची कलमे ५ आणि ८ चे पोट-कलम (२) यांअन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन करण्यात आलेले वायुयान नियम, १९३७ यांच्या भाग अकरा मध्ये अंतर्भूत असलेलया नियमांस अनुसरुन महाराष्ट्र "शिर्डी विमानतळ, शिर्डी, याकरिता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांस, 'विमानतळ लायसन-सार्वजनिक वापरार्थ' दिले आहे;

आणि ज्याअर्थी, शिर्डी येथील उक्त विमानतळाचे, "श्री साईबाबा आंतरराष्ट्रीय विमानतळ" असे पुनर्नामकरण करणे आणि त्या प्रयोजनासाठी, असा प्रस्ताव नागरी विमानचालक मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे पाठविण्यापूर्वी, त्यास राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळविल्यानंतर, नागरी विमानचालन, मंत्रालय, भारत सरकार यांची मान्यता मिळविणे इष्ट वाटते;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र विधानपरिषद नियम यांच्या नियम १०६ अनुसार महाराष्ट्र विधानपरिषद, याद्वारे, शिर्डी येथील उक्त विमानतळाचे "श्री साईबाबा आंतरराष्ट्रीय विमानतळ" असे पुनर्नामकरण करण्याची शिफारस केंद्र सरकारला करीत आहे.

- मध्यंतर -

दहा : शासकीय विधेयके -

(क) विधानसभेने संमत केल्यास — विधेयक विचारात घेणे -

"सन २०१७ चे वि.स.वि क्रमांक ८० — महाराष्ट्र विनियोजन (अधिक खर्च) विधेयक, २०१७"

(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे.

(१) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६० - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७"

विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद

रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६० - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

(२) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६२ — महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७" विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६२ — महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

(३) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५७ - महाराष्ट्र साक्षीदारास**

संरक्षण व सुरक्षा देण्याबाबत विधेयक, २०१७"

विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५७ - महाराष्ट्र साक्षीदारास संरक्षण व सुरक्षा देण्याबाबत विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

(४) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६३ - महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७"**

विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६३ - महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

(५) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६५ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (चौथी सुधारणा) विधेयक, २०१७"**

विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६५ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (चौथी सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) महसूल मंत्री
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

(६) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६७ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत (कारखान्याकडून करांऐवजी ठोक रकमेच्या स्वरुपात अंशदान देण्यासंबंधी) नियम (निरसन) विधेयक, २०१७"**

(७) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७१ - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७"**

(८) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७८ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०१७"**

(ग) **विधानसभेने सुधारणांसह संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५६ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१७"

विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे,

वि.प.स. यांचा प्रस्ताव :-

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५६ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) ग्रामविकास मंत्री
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(घ) विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडश: विचार व संमत करणे.

(१) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७९ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (पाचवी सुधारणा) विधेयक, २०१७"

(२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६६ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०१७"

अकरा : **सर्वश्री. शरद रणपिसे,** धनंजय मुंडे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल तटकरे, संजय दत्त, हेमंत टकले, जयंत पाटील, कपिल पाटील, आर्कि. अनंत गाडगीळ, सर्वश्री. अमरसिंह पंडित, सुभाष झांबड, सतिश चव्हाण, प्रा.जोगेन्द्र कवाडे, सर्वश्री.जयवंतराव जाधव, अमरनाथ राजूरकर, दत्तात्रय सावंत, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री.किरण पावसकर, सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री.जनार्दन चांदूरकर, ख्वाजा बेग, रामहरी रुपनवर, बाळाराम पाटील, आनंदराव पाटील, अब्दुल्लाखान दुर्राणी, हरिसिंग राठोड, नरेंद्र पाटील, चंद्रकांत रघुवंशी, प्रकाश गजभिये, अमरीशभाई पटेल, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. मोहनराव कदम, जयदेव गायकवाड, रामराव वडकुते, जगन्नाथ शिंदे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव —**

"संपूर्ण राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडलेली असणे, खून, घरफोड्या, बँक दरोडे, चोऱ्या यासारख्या गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्यात सरकारला अपयश येणे, अंमली पदार्थ, गुटखा, जुगार, मटका या अवैध धंद्यात प्रचंड वाढ होणे, अल्पवयीन मुले, मुली, महिलांवर व मागासवर्गीयांवर

होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होणे, वृध्दांवरील गुन्ह्यात झालेली वाढ, डान्सबारला आळा घालण्यात आलेले अपयश, सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, नक्षलवादी कारवायात निष्पापांचा जाणारा बळी, शेतकऱ्यांवर पोलीसांकडून अमानुषपणे गोळीबार, सांगली जिल्ह्यात अनिकेत कोथळे याचा पोलीसांच्या भीषण मारहाणीत झालेला मृत्यु, बेपत्ता अे.पी.आय. अश्विनी बिद्रे प्रकरणात संशयीत आरोपी असलेल्या पोलीस अधिकाऱ्यास मिळालेले अभय, मंजूळा शेटे हत्या प्रकरणात दोषींना मिळत असलेले पोलीस संरक्षण, वाळू माफीयांकडून शासकीय अधिकाऱ्यांना जीवे मारण्याच्या घडलेल्या घटना, महापालिका आयुक्तांना सुध्दा धमक्या आलेल्या असणे, राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूर शहर व परिसरातील वाढती गुन्हेगारी, गुंडांना पोलीसांमार्फत मिळणारे संरक्षण, दिवसा ढवळ्या होणाऱ्या खुनामुळे नागपूर शहरात दहशत पसरवून शहराची ओळख नागपूर ऐवजी गुन्हेपूर अशी होत असणे, पुणे, नागपूर, नाशिक यासारख्या शहरात संघटीत गुन्हेगारीने घातलेले थैमान, ऑनलाईन लॉटरीच्या नावाखाली होणारी फसवणूक, राज्यातील कैद्यांची वाढती संख्या व अपुरी पडत असलेली कारागृह व्यवस्था, कारागृहातील गैरप्रकारांना आळा घालण्यात आलेले अपयश, डॉ.नरेंद्र दाभोळकर व कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या तपासात होणारा विलंब, समीर गायकवाड व विरेंद्र तावडे यांच्या विरुध्द ठोस पुरावे असूनही सनातन संस्थेवरील बंदीबाबत कोणतीही कार्यवाही न होणे, फॉरेन्सिक लॅबमधील मोठ्या प्रमाणावरील रिक्त पदांमुळे शेकडो सॅम्पल प्रलंबित असणे, पोलीस दलातील रिक्त पदांमुळे पोलीसांवर पडणारा कामाचा वाढता ताण, परिणामी आयपीसी अंतर्गत होणाऱ्या दखलपात्र गुन्ह्यात महाराष्ट्र राज्य आघाडीवर असणे, पोलीस निवासस्थानांचा व त्यांचे विविध प्रश्न, समस्या सोडविण्याकडे झालेले दुर्लक्ष, राज्यातील ५५ लाखापेक्षा अधिक विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असणे, ऑनलाईनच्या घोळामुळे त्यांच्यावर शिष्यवृत्तीपासून वंचित राहण्याची वेळ येणे, राज्याच्या विविध खात्यात मोठ्या प्रमाणावर सुरू असलेला भ्रष्टाचार, घोटाळे, नोव्हेंबर, २०१७ मध्ये घोटाळेबाज शासन या नावाने वितरीत करण्यात आलेल्या पुस्तिकेतून राज्य मंत्रीमंडळातील अनेक मंत्र्यांची भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस येणे, गृहनिर्माण विभागात १ हजार कोटीपेक्षा जास्त घोटाळा उघडकीस येऊनही कारवाई न होणे, माहिती तंत्रज्ञान विभागात वस्तू व सेंवाच्या निविदांमध्ये घोळ असणे, त्यामुळे कर्जमाफी शिष्यवृत्ती सारख्या योजना राबविण्यात सरकारला अपयश येणे, राज्य मुल्यवर्धीत करामधून नैसर्गिक वायुला सवलत देताना विक्रीकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी साडेतीनशे कोटी रुपयांचा घोटाळा करणे, मत्स्यव्यवसाय विभागामार्फत देण्यात येणाऱ्या मासेमारींच्या ठेक्यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झालेला असणे, पशुसंवर्धन

विभागाच्या लाळ खुरकत लशीच्या खरेदी प्रकरणी प्रचंड अनियमितता झालेली असणे, त्यामुळे राज्यातील पशुधनाचे आरोग्य धोक्यात येऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न बुडण्याची दाट शक्यता निर्माण होणे, ग्रामविकास विभागाच्या राष्ट्रीय जीवनोन्नती अभियानात सॅनीटरी नॅपकीनच्या खरेदी निविदेत घोटाळा असणे, चिक्की खरेदी प्रकरणी ए.सी.बी.ने या गैरव्यवहाराची चौकशी न करता आरोप असलेल्या महिला व बालविकास विभागाकडे गैरव्यवहार झाला आहे काय अशी विचारणा करणे, ए.सी.बी. च्या अहवालामध्ये अनेक त्रुटी असणे, औद्योगिकरणाच्या वाढीसाठी उद्योग विभागामार्फत शेतकऱ्यांच्या जमीनींचे अधिग्रहण केले जात असतांना त्यांना योग्य मोबदला वेळेमध्ये दिला जात नसणे, या सर्व विभागामध्ये मनमानी कारभार सुरू असून विविध खात्यातील घोटाळ्यांमुळे भ्रष्ट सरकार म्हणून ओळख निर्माण होणे, या घोटाळ्यांची चौकशी होऊन कारवाई होत नसल्याचे सरकार भ्रष्टाचाराला पाठीशी घालत असल्याची भावना निर्माण होणे, भ्रष्टाचारी व्यक्तीची मालमत्ता जप्त करण्याचे शासनाने सन २०१४ ला ठरविलेले धोरण अंमलात न येणे, मुंबई विद्यापीठात पेपर तपासणीच्या कारणांमुळे सर्व शाखांचे रखडलेले निकाल, त्यामुळे विद्यार्थ्यांचे झालेले प्रचंड नुकसान, मुंबई विद्यापीठात झालेला गैरव्यवहार व अनागोंदी कारभार, यावर शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

बारा : (क) (मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर व बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —

प्रा.अनिल सोले, ॲड. अनिल परब, श्री.गिरीश व्यास, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, सर्वश्री. परिणय फुके, रविंद्र फाटक, श्रीमती स्मिता वाघ, सर्वश्री. तानाजी सावंत, मितेश भांगडिया, गोपीकिसन बाजोरिया, प्रविण दरेकर, विनायक मेटे, विजय ऊर्फ भाई गिरकर, सुजितसिंह ठाकूर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यात विदर्भातील सर्व जिल्हे व मराठवाड्यात पडलेला कमी पाऊस, त्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती विचारात घेण्याची आवश्यकता, या भागातील सिंचनाचा अनुशेष वेगाने पूर्ण करण्याची गरज, विदर्भातील अपुरे सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याकरिता केंद्राच्या सहाय्याने तयार केलेली बळीराजा जलसंजीवनी योजना तातडीने कार्यान्वित करण्याची आवश्यकता, बेंबळा प्रकल्पाच्या कामाला देण्यात आलेली गती, माजी पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांनी भूमीपुजन केलेल्या गोसीखुर्द प्रकल्पाच्या सर्व परवानग्या प्राप्त करुन प्रकल्पाची किंमत केंद्र शासनाने निश्चित करण्यासाठी झालेली कार्यवाही, अपुऱ्या पावसामुळे मूग, उडीद, सोयाबीन, कापुस, तूर व हरभरा इ.पिकांचे उत्पादन ३० ते ४० टक्क्यांवर येणे, डुक्कर, हत्ती इ. जनावारांमुळे

होणारे शेतीचे नुकसान रोखण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, पाणंद रस्त्यांचे बांधकाम व मजबुतीकरण प्राधान्याने करणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या उद्देशाने उत्पादन खर्च कमी करणे, नैसर्गिक व सेंद्रिय शेती आणि फळबागांच्या लागवडीस प्रोत्साहन देणे, संत्राउद्योग, दुग्धव्यवसाय, कुकुटपालन, मत्स्यव्यवसाय इ. शेतीच्या जोडधंद्यांना प्रोत्साहन देणाऱ्या योजना कार्यान्वित करणे, शेतमालाला किमान हमीभावाप्रमाणे दर मिळण्याची व जेथे कमी भाव असेल तेथे अनुदान देण्याची गरज, जलयुक्त शिवार योजनेमुळे शाश्वत सिंचनाच्या सुविधा उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणात आलेली गती, ही योजना अधिक प्रभावी करण्याकरिता या योजनेच्या अटी व निकष शिथिल करण्याची आवश्यकता, कृषीपंपांना दिवसा १२ तास वीज उपलब्ध करण्याच्या दृष्टीने सोलर फिडरची योजना कार्यान्वित करणे व वीजपंप जोडणीच्या प्रलंबित अर्जांचा डिसेंबर, २०१७ पर्यंत शीघ्रगतीने निपटारा करण्याची आवश्यकता, राज्यातील वीज वितरण व्यवस्था अधिक मजबुत करण्यासाठी नविन उपकेंद्र, रोहित्र व पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता, सिंचन अनुशेषाच्या भागात अधिक अनुदान देण्याची गरज, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेमध्ये शासनाने ४ हजार ५०० कोटी रुपये उपलब्ध करुन दिले असणे, त्यामुहे ५ हजार गावांमध्ये शेती उत्पादन वाढून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे व शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध झाली असणे, आत्महत्याग्रस्त ६ जिल्ह्यांपेक्षा एकट्या मुंबईला अधिक कर्जमाफी देण्याचे पूर्वीच्या शासनाने धोरण असताना अवघ्या ५ महिन्यात संपूर्ण राज्यभरात कर्जमाफीची प्रक्रिया गतीने पूर्णत्वाकडे येणे, कृषी खात्यातील रिक्त पदे तातडीने भरणे व आशाच्या धर्तीवर शेतकरी मित्र नेमण्याची आवश्यकता, केंद्र शासनाने नदीजोड प्रकल्प राज्यात कार्यान्वित करण्याची आवश्यकता, एमआरईजीएस मध्ये मोठ्या प्रमाणात सिंचन विहिरी करण्याची आवश्यकता, कृषीमालावर आधारित प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी विशेष आर्थिक क्षेत्र उभे करण्याची आवश्यकता, विदर्भाच्या समग्र विकासाला वेग देण्याची आवश्यकता, अमरावती भागात उभारण्यात येणाऱ्या टेक्सटाईल पार्कला अधिक गती देण्याची आवश्यकता, मोर्शीत संत्रा प्रक्रिया प्रकल्प सुरू करणे व संत्रा धोरण जाहिर करणे, मिहानमध्ये मोठ्या संख्येने येत असलेली गुंतवणूक, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना यशस्वीपणे व पारदर्शकरित्या राबविल्यामुळे शेतकरी पुन्हा कर्ज घेण्याकरिता पात्र होणे, मागील ३ वर्षात शासनाने शेतीमधील गुंतवणूक वाढविल्यामुळे शेतीचा विकास दर सतत नकारात्मक राहत असताना हा दर प्रथमच + १२.५ टक्क्यांवर नेण्यास शासनास आलेले यश, राज्यातील शेतकरी कायमस्वरुपी स्वबळावर उभा राहू शकेल व त्याला भविष्यात कर्ज घेण्याची पाळी येणार नाही या दृष्टीने

योजना आखून त्या तातडीने कार्यान्वित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(ख) **(मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर व बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

ॲड. अनिल परब, श्री. प्रविण दरेकर, डॉ. (श्रीमती) नीलम गोऱ्हे, सर्वश्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, रविंद्र फाटक, प्रा.अनिल सोले, सर्वश्री. गोपीकिसन बाजोरिया, प्रसाद लाड, सुजितसिंह ठाकूर, रामनिवास सिंह, गिरीशचंद्र व्यास, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. चंदुभाई पटेल, परिणय फुके, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासीपाडे आणि अधिकृत झोपडपट्टीतील रहिवाशी यांना स्थलांतरीत करण्याबाबत शासनाने आखलेली उपाययोजना, सर्वसाधारण पात्र झोपडपट्टीवासियांच्या स्थलांतरासाठी शासनाने घ्यावयाचा सकारात्मक निर्णय, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या सर्व्हे नं. २३९/१ या वन क्षेत्राची मोजणी करुन अतिक्रमित रहिवाश्यांचे त्याच क्षेत्रात पुनर्वसन करण्याबाबत दिंडोशी येथील लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१६ व त्यानंतर वारंवार मा.मुख्यमंत्री, मा.वने मंत्री व मा.गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केलेली मागणी, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन्यप्राण्यांचा शहरात होणारा मुक्त संचार व त्यावर करावयाच्या उपाययोजना, मुंबई शहरातील नद्या व नाले यांच्या रुंदीकरणामुळे बाधीत होणाऱ्या रहिवाश्यांचे त्याचठिकाणी पुनर्वसन करणे, मुंबईतील भुमिपुत्र असलेल्या कोळीवाड्यातील बांधवांना कायमची घरे व कोळीवाड्यांचा पुनर्विकास करण्याची गरज, आशियाखंडातील सर्वात मोठ्या मुंबईतील धारावी येथील झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्याचा शासनाने घेतलेला महत्वकांक्षी निर्णय, सदरहू झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्यासाठी शासनाने आखलेली उपाययोजना, मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत आठ आमदारांच्या समितीने केलेल्या शिफारशीवर निर्णय घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, या प्रस्तावावर तातडीने निर्णय होण्याची आवश्यकता, राज्यात पंतप्रधान आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ३३ हजार ५०० व इतरांसाठी ६२५० घरे उभारण्याची म्हाडाने आखलेली उपाययोजना, मुंबईसोबतच पुणे, पिंपरी चिंचवड, कोल्हापूर, नागपूर, नाशिक व सर्व महाराष्ट्रात स्वस्त घरांच्या योजनांना गती देण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

तेरा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) -

(१) **श्री.शरद रणपिसे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा**

उपस्थित करतील.

"पुणे शहर व जिल्ह्याचा वेगाने होणारा विकास विचारात घेता पुणे जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याची आवश्यकता असून गत सुमारे दहा वर्षापासून राज्य शासनाकडून कार्यवाही सुरु असणे, पुणे जिल्ह्यात उद्योग व्यापार-व्यवसायाची मोठ्या प्रमाणात उलाढाल असून नवनवीन आंतरराष्ट्रीय कंपन्या पुणे जिल्ह्यात गुंतवणूक करीत असणे, मात्र विस्तार विकासात आंतरराष्ट्रीय गुंतवणुकीसाठी आंतरराष्ट्रीय विमानतळाअभावी अडचण निर्माण झालेली असणे, त्याचा विकासावर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होत असणे, पुणे जिल्हयात जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय गुंतवणूक व्हावी तसेच जिल्हयातील व जवळपासच्या भागातील विकास साधता यावा यासाठी आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याची आवश्यकता असणे, यासाठी पुणे जिल्ह्यातील पुरंदर येथे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान अठराशे हेक्टर जागा उपलब्ध करण्यात आलेली असून एअरपोर्ट ॲथॉरिटीच्या पथकाने त्यास माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मान्यता दिलेली असून तसा अहवाल राज्य शासनास सादर केलेला असणे, संपूर्ण राज्याच्या प्रगतीमध्ये हा विमानतळ महत्त्वाचा घटक ठरणार असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री.संजय दत्त, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबई शहरात बालमजुरांचे सर्वाधिक प्रमाण असल्याचे स्वयंसेवी संस्थेने केलेल्या सर्वेक्षणातून निदर्शनास येणे, मुंबई शहरात जरीकाम, चामडयाचे काम, प्लॉस्टिकच्या कंपन्यामध्ये, हॉटेलमध्ये, चहाच्या टपरीवर, गॅरेजमध्ये सर्वाधिक बालमजूरांकडून कमी पगारात काम करून घेतले जात असणे, पोलीस धाड घालून बालमजूरांची सुटका करत असणे, परंतु, त्यांना पुन्हा पालकांच्या स्वाधीन करतात मात्र बिकट आर्थिक परिस्थितीमुळे ही मुले काही काळ गेल्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणी काम करताना दिसत असणे, त्यामुळे शासनाने बालमजुरीस प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना केल्यातरी या कायद्यांची अंमलबजावणी मुंबई शहरात होत नसल्याने बालमजुरांचे प्रमाण वाढत असणे, राज्य शासनाने मुंबई शहरातील बालमजुरांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सोडविण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

विधान भवन,
नागपूर,
दिनांक : २० डिसेंबर, २०१७.

डॉ.अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.